दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

www.diwanews.com

दिवा न्यूज
आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूजची वेबसाईट सुरु..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

▶ वर्ष-२ ■ अंक-५१ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १७ जुलै २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

## डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न पुन्हा पेटणार

## भंडार्ली परिसरातील ग्रामस्थ आक्रमक





## दोन महिन्यात डायघर डम्पिंग प्रकल्प सुरू करण्याचे आयुक्तांचे आश्वासन

**ठाणे:-** भंडारली येथील डम्पिंग ग्राउंड बंद करावे या मागणीसाठी स्थानिक नागरिकांनी मनसेचे आमदार राजू पाटील यांच्या माध्यमातून आक्रमक भूमिका घेतली आहे.

एका आठवड्यात मुख्यमंत्रीची भेट झाली नाही तर भंडार्ली प्रकल्प बंद केला जाईल असे अल्टिमेटम रहिवाशांनी पालिकेला दिले आहे. तसेच शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन नुकसान भरपाई द्यावी, १४ गावांचा समावेश नवी मुंबई महापालिकेत करावा अशी मागणी देखील यावेळी करण्यात आली.

दिवा येथील डम्पिंग बंद करुन ठाणे महापालिकेने भंडार्ली येथे तात्पुरता स्वरुपात कचरा प्रकल्प उभारला आहे. परंतु शुक्रवारी मनसेचे आमदार प्रमोद पाटील आणि स्थानिकांनी हा प्रकल्पच बंद पाडला. त्यानंतर शनिवारी पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांची भेट घेतली. यावेळी शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावली जाणार असल्यामुळे या प्रकल्पाचा नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही आणि दुर्गंधी येणार नाही, असा दावा पालिकेने केला होता.

(पान ५ वर)

## अधिकारी-ठेकेदारांचे लागेबांधे; खड्ड्यांमुळे ठाणेकरांचे होतात वांदे!



### अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा
### आमदार संजय केळकर

**ठाणे:** राज्य शासनाने ठाण्यातील रस्त्यांसाठी ६५० कोटी दिले, पण अधिकारी आणि ठेकेदारांच्या आर्थिक लागेबांधे असल्याने रस्ते खड्ड्यात गेले. त्याचा नाहक फटका करदात्या ठाणेकरांना बसत आहे. आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत आणि ठेकेदारांना का यादीत टाकावे, अशी मागणी आमदार संजय केळकर यांनी केली. ठाण्यातील रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून अपघात, वाहतूक कोंडी अशा समस्यांनी सर्वसामान्य ठाणेकर गांजला आहे. या समस्यांना अधिकारी आणि ठेकेदार जबाबदार असल्याचा आरोप आमदार केळकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला.

राज्य शासनाने ठाण्यातील रस्त्यांसाठी ६५० कोटी रुपये दिले. मात्र अनेक रस्ते कमी पावसातच खड्ड्यात गेले. दर्जाहीन कामे झाल्याने हा निधी वाया जात आहे. भर पावसात खडी सिमेंट टाकून खड्डे बुजवण्याचा लाजिरवाणा प्रकार ठाण्यात पाहायला मिळाला. आयुक्तांनी १२ तासांत खड्डे बुजवण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले, मात्र अधिकारी आणि ठेकेदारांचे आर्थिक हितसंबंध असल्याने हे आदेश हवेत विरले. आयुक्तांचा आणि अधिकाऱ्यांचा ताळमेळ नसावा तर दुसरीकडे अधिकारी आणि ठेकेदारांची हातमिळवणी आहे, त्यामुळेच प्रामाणिकपणे कर भरूनही ठाणेकरांना खड्ड्यांशी सामना करावा लागत आहे. अशा अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करून त्यांना निलंबित करावे आणि संबंधित कंत्राटदारांना पुन्हा काम देण्यात येऊ नये, अशी मागणी श्री.केळकर यांनी आयुक्तांकडे केली आहे.

### नागरिकांना त्रासदायक वाहतूक बदल पूर्ववत करणार

सध्या नागरिकांना विश्वासात न घेता वाहतुकीत बदल होत आहेत. काही ठिकाणी दुभाजकांनी वळण रस्ते बंद केले जात आहेत, तर कुठे मार्गच बदलले जात आहेत. यामुळे वाहन चालक आणि नागरिकांची ससेहोलपट होत आहे. याबाबत आमदार संजय केळकर यांना विचारले असता ते म्हणाले, वाहतूक बदल हे नागरिकांना त्रासदायक नव्हे तर फायदेशीर असावेत, याबाबत मी या पूर्वीच वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांना सुचित केले आहे. सध्या सुरू असलेले बदल निश्चितच नागरिकांना त्रासदायक असून विरोध होत आहे. त्यामुळे झालेले आणि होत असलेले बदल पूर्ववत करून नागरिकांना दिलासा देणार असल्याचे केळकर म्हणाले.

# ठाणे शहरात भाजपातर्फे नवमतदार नोंदणीचा 'श्रीगणेशा'

## विनय सहस्रबुद्धे यांच्या उपस्थितीत नोंदणी सुरू

**ठाणे:** देशाच्या सुरक्षेसाठी मतदान करा, पण त्याआधी मतदार बनावे, असे आवाहन भाजपाचे ठाणे लोकसभा मतदारसंघ निवडणूकप्रमुख व माजी खासदार विनय सहस्रबुद्धे यांनी शनिवारी ठाण्यात तरुणाईला केले. देशाच्या उज्वल भविष्यासाठी व आपल्या लहान भावंडांच्या कारकिर्दीसाठी तरुणांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना पाठिंबा द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

भाजपा ठाणे शहराच्या वतीने १८ वर्षे पुर्ण झालेल्या युवावर्गाच्या नवमतदार नोंदणी अभियानाचा शुभारंभ भाजपच्या खोपट कार्यालयात करण्यात आला. त्यावेळी सहस्रबुद्धे बोलत होते. या वेळी भाजपाचे आमदार व जिल्हाध्यक्ष निरंजन डावखरे, माजी खासदार संजीव नाईक, माजी महापौर सागर नाईक, माजी गटनेते मनोहर डुंबरे, ठाणे शहर मतदारसंघ निवडणूक प्रमुख सुभाष काळे, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष रवी व्यास, ठाणे जिल्हा सरचिटणीस विलास साठे, कैलास म्हात्रे, कृष्णा भुजबळ, सारंग मेढेकर, सुजय पतकी आदी उपस्थित होते.

'सक्षम भारत हवा असेल तर मतदार होऊन मतदान करावे, असे आवाहन आमदार निरंजन डावखरे यांनी केले. तर जास्तीत जास्त तरुणांनी मतदार होण्यासाठी अभियान सुरू करण्यात आले आहे, असे संजीव नाईक यांनी नमूद केले.

# मुंब्र्यात छताचे प्लास्टर पडून भाऊ-बहिण जखमी

**ठाणे:** मुंब्र्यातील मेहक इमारतीमधील २०३ या सदनिकेच्या हॉल मधील छताचे प्लास्टर पडून इब्राहिम शेख (९) आणि अनुप शेख (७) हे भाऊबहिण किरकोळ जखमी झाल्याची घटना गुरुवारी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास समोर आली. त्या दोघांवर कळवा छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात प्राथमिक उपचार करून घरी सोडण्यात आले आहे. इब्राहिम याच्या डोक्याला आणि अनुप हिच्या उजव्या हाताला दुखापत झालेली आहे. ही घटना घडली तेंव्हा घरात चौघे जण होते. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

मुंब्रा अमृतनगर परिसरात मेहक नावाची तळ अधिक ५ मजली इमारत आहे. याच इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील सदनिका नंबर २०३ मध्ये आरिफ शेख हे भाडेकरु आहेत. त्याच सदनिकेच्या हॉलमधील छताचे प्लास्टर पडले असून त्यामध्ये इब्राहिम आणि अनुप हे भाऊ बहीण किरकोळ जखमी झाले आहेत. त्या दोघांवर उपचार करून घरी सोडण्यात आले. ही घटना घडली तेंव्हा ते घरात झोपले असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशमन दल या विभागांनी धाव घेतली होती. असे आपत्ती व्यवस्थापन कक्षाने सांगितले.





# वागळे इस्टेट येथे घराची भिंत कोसळली

## ३ कुटुंबांचे तात्पुरत्या स्वरूपात केले स्थलांतरीत

**ठाणे:** वागळे इस्टेट, राम नगर येथे एका बंद रिकाम्या केलेल्या चाळीतील घराची भिंत व काही भाग कोसळल्याची घटना मंगळवारी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास समोर आली. या घटनेत सुदैवाने कोणालाही दुखापत झालेली नसून सुरक्षेच्या दृष्टीने बाजूच्या ०३ कुटुंबांना शेजारच्या चाळीमध्ये तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरीत करण्यात आले आहे. तर,आवश्यक तितका धोकादायक भाग पडण्यात आला असून घटनास्थळी चाळीतील तिन्हीही बंद रिकामी घरे धोकादायक स्थितीत असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

वागळे इस्टेट येथे रिकाम्या केलेल्या चाळीतील घराची भिंत व काही भाग कोसळला आहे. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाला मिळताच घटनास्थळी ठामपा बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, महावितरण कर्मचारी, वागळे इस्टेट पोलीस स्थानकाचे पोलीस कर्मचारी तसेच अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. सुदैवाने भिंत पडलेले घर रिकामे असल्याने कोणालाही दुखापत झाले नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे घटनास्थळी आवश्यक तितका धोकादायक भाग पाडण्यात आला. तसेच त्या चाळीतील तिन्हीही बंद रिकामी घरे धोकादायक झालेल्या आहेत. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांकडून धोकादायक असेलेल्या घरांभोवती धोकापट्टी बांधण्यात आली असून सुरक्षेच्या दृष्टीने बाजूच्या ०३ कुटुंबांना शेजारच्या चाळीमध्ये तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरीत करण्यात आले आहे.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# साऊंड बॅरियर पोल पार्क केलेल्या चार चाकीवर पडले

## चार चाकीचे झाले नुकसान

**ठाणे:** कॅसलमिल या ठिकाणी उड्डाणपुलावर बसलेल्या साऊंड बॅरियर पोल व साऊंड बॅरियर प्लेट त्या उड्डाणपुलाखाली रस्त्यावर पार्क केलेल्या चारचाकीवर पडल्याची घटना शुक्रवारी सकाळी साडेदहा ते पावणेअकरा वाजण्याच्या सुमारास समोर आली. याघटनेत त्या चारचाकी गाडीचे नुकसान झाले असून सुदैवाने यामध्ये कोणालाही दुखापत झालेली नाही. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी



आपत्ती व्यवस्थापन व उथळसर प्रभाग समिती सार्वजनिक बांधकाम या विभागांनी धाव घेतली. त्या विभागाच्या कर्मचाऱ्यांनी पडलेले साउंड बॅरियर पोल व साउंड बॅरियर प्लेट बाजूला केले. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# गोर बंजारा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**ठाणे:** दहावी, बारावी आणि विविध स्पर्धा परीक्षेत चांगली कामगिरी केलेल्या गोर बंजारा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार येत्या १५ जुलै २०२३ रोजी संध्याकाळी ४ वाजता आयपीएस तथा ठाणे वाहतूक शाखेचे डीसीपी डॉ विनयकुमार राठोड, उपजिल्हाधिकारी जयराम पवार यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. वसंतराव नाईक सभागृह , बी कॅबिन, दादापाटिलवाडी येथे होणाऱ्या या कार्यक्रमात आता नव्याने निवड झालेल्या सरकारी अधिकारी आणि पोलिस अधिकारी यांचे सत्कारदेखील करण्यात येणार असल्याची माहिती गोर सेना राष्ट्रीय अध्यक्ष अरुण चव्हाण यावेळी म्हणाले.

गोरसेना, गोर सिकवाडी कटमाळो यांच्यावतीने आयोजित गोर बंजारा समाजाच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमात नीट परीक्षेत चांगली कामगिरी केलेल्या वैष्णवी राठोड, टाऊन प्लानर म्हणून नियुक्त अनुश्री राठोड, पीएसआय प्रतीक्षा राठोड आणि पत्रकार गीता आडे यांच्यासह नव्याने पोलिस दलात नियुक्त झालेल्या २१ पोलिस उपनिरीक्षक यांचे सत्कार यावेळी करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे प्रमुख पाहुणे यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार असल्याचे अरुण चव्हाण यावेळी म्हणाले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# दिवा रेल्वे सुरक्षा बलाची कौतुकास्पद कामगिरी

दिवा रेल्वे स्थानकात गरिब रथ रेल्वे मध्ये पाय घसरून फरपटत जाणाऱ्या ज्येष्ठ नागरिकाला रेल्वे सुरक्षा बल दिवास्थानकाच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी जीवदान दिले. सुरेश यशवंत सुर्वे असे या जेष्ठ नागरिकाचे नाव असून हे जेष्ठ नागरिक चिपळूण ते ठाणे असा प्रवास करत होते. दिवा रेल्वे स्थानकात गरिब रथ रेल्वे स्लो झाल्यानंतर कोणतं स्थानात आले हे पाहण्यासाठी सुर्वे हे बाहेर आले असता त्यांचा पाय घसरून ते प्लॅटफॉर्म व रेल्वे यामध्ये फरफट चालले होते. यावेळी ड्युटीवर असणारे आरपीएफ रेल्वे कर्मचारी कपिल तोमर यांनी सदर ज्येष्ठ नागरिकाला आपल्या जीवाची परवा न करता धावत जाऊन वाचवले व त्यानंतर रेल्वे सुरक्षा बलाच्या कार्यालयात आणून त्यांची विचारपूस केली.




# दिव्यांग ह्युमन राईट फेडरेशनच्या वतीने गुणगौरव समारंभ संपन्न




**दिवा:- दिवा शहरात दिव्यांग ह्यूमन राईट फेडरेशन च्या वतीने विद्यार्थ्यांचा गुणगौरव व तसेच समाजसेवकांचा मानव सृष्टी समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.सदर कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.**

ठाणे जिल्ह्यातील दिवा शहरांमध्ये ''दिव्यांग हयुमन राईट फेडरेशन ''च्या वतीने इयत्ता दहावी व बारावी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा साजरा करण्यात आला. तसेच सामाजिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या पदाधिकारी, समाजसेवक यांना त्यांच्या कामाची पोचपावती म्हणून ''मानव- सृष्टी समाजरत्न पुरस्कार ''म्हणून गौरव करण्यात आला .यामध्ये दिव्यातील दिव्यांग तसेच महिला व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते .याचे आयोजन दिवा कमिटी पदाधिकारी, आयोजक श्री चंद्रकांत पाटील तसेच विराज धसाडे ,विकास पवार ,शर्मा आहिरे मॅडम, सुमन पवार मॅडम ,रिटा मॅडम, शिंदे मॅडम ,विजय आहिरे, प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक भरत जाधव सर तसेच संजय सर ,संतोष मोरे ,रवींद्र देसाई ,बाळकृष्ण मिळजोळकर, तसेच प्राध्यापिका उज्वला जाधव उपस्थित होते.विद्यार्थ्यांना, दिव्यांगांना बहुजन वर्गाला न्याय देण्यासाठी '' मानव सृष्टी के राइट्स ''या यूट्यूब चैनल चे प्रकाशन करण्यात आले. संपादक म्हणून प्राध्यापक भरत जाधव सर, उपसंपादक संतोष मोरे, तसेच कार्यकारी प्रमुख अनिरुद्ध तिवारी यांची नेमणूक करण्यात आली. या कार्यक्रमाला स्थानिक पदाधिकारी व समाजसेवक शरद निकम, सचिन पाटील ,प्रवीण उतेकर साहेब तसेच पत्रकार समाजसेवक चव्हाण साहेब तसेच यांना'' मानव मानव सृष्टी समाज रत्न पुरस्कार'' देऊन गौरवण्यात आले. तसेच दिव्यांग ह्यूमन राईट फेडरेशन पदाधिकारी यांना सुद्धा पुरस्कार देण्यात आले.

# दिवा मनसेच्या प्रयत्नाने बेडेकर नगर ते रविना अपार्टमेंट येथील रस्त्याचे काम सुरू!

## नागरिकांनी मानले मनसे पदाधिकाऱ्यांचे आभार




**दिवा:-** बेडेकर नगर मधील रवीना अपार्टमेंट परिसरातील नागरिकांना दिवा मनसेच्या पाठपुरावामुळे दिलासा मिळाला आहे. मनसेच्या प्रयत्नाने येथील रस्ता होण्यास सुरुवात झाली आहे.

बेडेकर नगर मधील रविना अपार्टमेंट परिसरात नागरिकांना मागील काही वर्षांपासून रहदरीसाठी रस्ताच उपलब्ध नसल्याने येथील नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. रुग्णवाहिका आणि अग्निशामक दलाची गाडी याठिकाणी जाणे सुद्धा येथे शक्य नव्हते. सदर विभागात रस्ता बनविण्यासाठी मनसेकडून वारंवार पत्राच्या माध्यमातून पत्रव्यवहार करण्यात आला होता. रस्ता बनवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या जागेचा योग्य तो मोबदला जमीन मालकांना देऊन तातडीने रस्ता बनवून नागरिकांना दिलासा द्यावा अशी भूमिका मनसेने त्यावेळी मांडली होती.येथील राहणाऱ्या स्थानिक सर्वसामान्य जनतेला न्याय मिळावा यासाठी मनसेचे पदाधिकारी प्रयत्न करत होते.

पण वारंवार पाठपुरावा करूनही महापालिका कुठलीच कार्यवाही करत नसल्याने मनसेच्या बेडेकर नगरच्या पदाधिकाऱ्यांनी नागरिकांना येण्या-जाण्यासाठी महापालिका रस्ता देऊ शकत नसल्यास किमान रोप वे ची सुविधा उपलब्ध करून देण्याची उपरोधिक मागणी केली होती.मनसेचे दिवा शहर अध्यक्ष तुषार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली येथील मनसे कार्यकर्ते नागरिकांच्या मागणीसाठी लढा देत होते. अखेर उशिरा का होईना पण ठाणे महापालिकेकडून या रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यात आल्याने मनसेने ठाणे महापालिकेचे आभार मानले आहेत.



दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, १७ जुलै २०२३


# महागाईविरोधात युवक काँग्रेसने केले आंदोलन




**ठाणे:** टोमॅटोचा भाव १५० ते २०० रुपये किलोवर पोहोचला आहे. यासोबतच इतर भाज्यांचे दरही गगनाला भिडले आहेत. दिवसेंदिवस वाढणाऱ्या महागाईच्या निषेधार्थ शनिवारी ठाणे मध्यवर्ती काँग्रेस कार्यालयाबाहेर प्रदेश सरचिटणीस सोनलक्ष्मी घाग आणि ठाणे युवक काँग्रेसचे अध्यक्ष आशिष गिरी यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने करण्यात आली.

टोमॅटोचे भाव हा राजकारणाचा मोठा मुद्दा बनला आहे. टोमॅटोच्या दरवाढीवरून सोशल मीडियावर राजकारण होत आहे. युवक काँग्रेसने भाजपला चढ्या भावाने लक्ष्य केले आहे. सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे आज जनता महागाईने त्रस्त आहे, असा टोला काँग्रेसचे युवा अध्यक्ष आशिष गिरी यांनी सरकारवर लगावला. टोमॅटो असो की मिरची, आले, लसूण यासह हिरव्या भाज्या, भाव गगनाला भिडले असले तरी सरकार झोपेत आहे आणि जनता मात्र त्रागा करत आहे.

युवक काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस सोनलक्ष्मी घाग म्हणाल्या की, सर्वसामान्यांच्या जीवनावश्यक वस्तूंसह टोमॅटो व इतर भाजीपाल्याचे दर वाढत असून घरगुती गॅस सिलिंडरचे दर ज्याप्रकारे वाढत आहेत. ते रोखण्यात केंद्र व राज्य सरकार अपयशी ठरले आहे. अशा परिस्थितीत जिथे जनता त्रस्त आहे, तिथे सत्ताधारी सुखी आहेत.

या आंदोलनात राष्ट्रीय युवक काँग्रेसचे सचिव अहसान खान, ठाणे शहर जिल्हा युवक काँग्रेसचे प्रभारी विश्वजित पाटील, महाराष्ट्र राज्य विधी सेलच्या अध्यक्षा जिया शेख, यांच्यासह युवक काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यस्तरीय पत्रकारांच्या विविध समितीवर ठाणेकरांची छाप

## सहा ज्येष्ठ पत्रकारांची निवड

## जिल्ह्यातील पत्रकारांमध्ये जल्लोष

**ठाणे :** राज्यस्तरीय अधिस्वीकृती कमिटीच्या सदस्यपदी, पत्रकार कल्याण निधी समितीवर आणि मुंबई विभागीय समिती अशा महत्वाचा समितींवर ठाणे शहरातील सहा ज्येष्ठ पत्रकारांची निवड झाली आहे. या सहा जणांच्या या समितींवर एकावेळी निवड होण्याची ही पहिली वेळ असून या समितींवर पहिल्यांदा ठाण्याची छापण्यास मिळून येत आहे.

ठाणे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय पितळे, मंत्रालय विधीमंडळ वार्ताहर संघाचे माजी अध्यक्ष दिलीप सपाटे, ज्येष्ठ पत्रकार जयेश सामंत आणि इलेक्ट्रॉनिक माध्यम विभागातून मुंबई टीव्ही जर्नलिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष विनोद जगदाळे अशी तिघांची राज्यस्तरीय अधिस्वीकृती कमिटीच्या सदस्यपदी नियुक्ती झाली आहे. तर शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सव पत्रकार कल्याण निधी समितीवर ज्येष्ठ संपादक कैलाश म्हापदी यांची निवड झाली असून ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाचे खजिनदार व ज्येष्ठ छायाचित्रकार विभव बिरवटकर यांची मुंबई विभागीय समितीवर नियुक्ती झाली आहे.

# झेडपीत अनुकंपा तत्त्वावर १६ जणांची नियुक्ती

**ठाणे:** जिल्हा परिषेदेतील विविध वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील उपलब्ध रिक्त पदांवर अनुकंपा प्रतिक्षा सुचितील १६ उमेदवारांना अनुकंपातत्वावर जुन मध्ये नियुक्ती करण्यात आली आहे. अशी माहिती ठाणे जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, अविनाश फडतरे यांनी दिली.

ठाणे जिल्हा परिषदेमार्फत शासन सेवेत कार्यरत असताना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटूंबातील एका पात्र उमेदवारास अनुकंपातत्वावर नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याच्या प्रक्रियेमध्ये फेब्रुवारी महिन्यात ठाणे जिल्हा परिषदेची अनुकंपा उमेदवारांची प्रतिक्षासुची प्रसिध्द करण्यात आली. त्यानंतर अनुकंपा भरतीबाबत शासन निर्णयातील मार्गदर्शकतत्वे व ठाणे जिल्हा परिषदेकडील प्रसिध्द करण्यात आलेल्या अनुकंपा प्रतिक्षासुचीमधील उमेदवारांच्या जेष्ठतेनुसार जिल्हा परिषदेमध्ये अनुकंपा भरतीसाठी उपलब्ध असलेल्या रिक्त पदांवर एकूण १६ उमेदवारांची निवड यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

तसेच इतर उमेदवारांकडून निवड यादीबाबत आक्षेप/ हरकती मागविण्यात आल्या. याअनुषंगाने प्राप्त झालेल्या हरकतींचे निराकरण करून मा. मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती प्रक्रिया पार पडली आहे.

# आमदार संजय केळकर यांच्या वाढदिवसानिमित्त कळव्यातील रुग्णालयात १०० किटचे वाटप



**ठाणे:** नौपाडा व्यापारी सेलचे अध्यक्ष मीतेश भाई शहा यांच्या वतीने ठाणे शहराचे आमदार संजय केळकर यांच्या वाढदिवसानिमित्त कळव्यातील ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील नवजात शिशु व मातांना १०० बाळंतविडा व फळे वाटप करण्यात आले आहे. या प्रसंगी ठाणे शहर अध्यक्ष ॲड निरंजन डावखरे , परिवहन सदस्य विकास पाटील, ठाणे शहर सरचिटणीस कैलास म्हात्रे, युवा मोर्चा संपर्क प्रमुख बिपीन गेहलोत, राजा भाऊ सोनगाडा,सर्व व्यापारी आघाडी,छत्रपती कळवा हॉस्पिटल चे डॉक्टर व समस्त कर्मचारी पदाधिकारी उपस्थित होते.

# ठाण्यात कोल्ह्याचे दर्शन

## तो वाट चुकल्याने आल्याची शक्यता

**ठाणे:** नौपाड्यासारख्या शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी शुक्रवारी सायंकाळी अचानक कोल्ह्याचे दर्शन झाले. त्या कोल्ह्याला वाइल्ड लाईफ वेल्फेअर असोसिएशनच्या (डब्ल्यूडब्ल्यूआर) सदस्यांनी जाळी टाकून पकडल्यानंतर शनिवारी त्या कोल्ह्याला कांदळवनात पुन्हा सोडण्यात आले. तो कोल्हा पाच ते सहा महिन्यांचा असून तो नर जातीचा आहे.

नौपाडा, भास्कर कॉलनी परिसरात मोडकाळीला आलेल्या इमारतींमध्ये कोल्ह्या सारखा प्राणी दिसत असल्याची माहिती डब्ल्यूडब्ल्यूआर या संस्थेला मिळाल्यावर त्या संस्थेच्या सदस्यांनी धाव घेतली. त्यानंतर त्याला जाळी टाकून पकडले. त्याची वैद्यकीय तपासणी केल्यावर त्याला कोणतीही दुखापत झाली नसल्याची बाब पुढे आली.

तसेच तो वाट चुकून नौपाड्यासारख्या ठिकाणी आलेला असावा, शनिवारी त्याला कांदळवनात सोडण्यात आल्याची माहिती संस्थेचे सदस्य आदित्य पाटील यांनी बोलताना दिली.

# रस्ते दुरुस्तीसाठी मास्टिक तंत्र ठरते आहे फायदेशीर

**ठाणे : रस्ते दुरुस्तीसाठी ठाणे महापालिका क्षेत्रात मास्टिक पद्धतीचा अवलंब केला जात आहे. त्याचा आतापर्यंत चांगला परिणाम दिसला असून मेट्रो, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि एमएसआरडीसी यांनीही तोच पर्याय वापरावा आणि रस्ता खराब असल्याचे आढळल्यापासून १२ तासांच्या आत त्या रस्त्याची दुरुस्ती केली जावी, असे निर्देश ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले आहेत.**



## १२ तासात खड्डे भरण्याचे सूत्र इतर यंत्रणांनीही स्वीकारण्याची आयुक्त अभिजीत बांगर यांची सूचना

ठाणे महापालिका क्षेत्रात महापालिकेसह निरनिराळ्या सरकारी संस्थांकडे रस्ते आणि पूल यांचे व्यवस्थापन आहे. मात्र रस्ता खराब झाल्याचे निदर्शनास आल्यावर कोणाचीही वाट न पाहता सर्वप्रथम नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी तो रस्ता दुरुस्त केला जावा, असे निर्देश आयुक्त बांगर यांनी यापूर्वीच महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागास दिले आहेत. रस्त्यावरील खड्डा सहन केला जाणार नाही, अशी भूमिका घेऊन खड्ड्यांबद्दल पराकोटीची असहनशीलता ठेवा आणि काम करा, याचा पुनरुच्चार आयुक्तांनी सर्व यंत्रणाच्या सोमवारी झालेल्या बैठकीत केला.

आपापल्या हद्दीतील सर्व रस्त्यांची पाहणी करून आवश्यकता असेल तिथे दुरुस्तीचे नियोजन करावे. दुरुस्ती झाल्यावर स्वतः प्रत्यक्ष खात्री करून घ्यावी, अशा सूचना आयुक्त बांगर यांनी महापालिकेच्या कार्यकारी अभियंत्यांना दिल्या. त्याचबरोबर, इतर यंत्रणांच्या अधिकाऱ्यांनीही आपापल्या रस्ते हद्दीत काटेकोर सर्वेक्षण करावे, अशी अपेक्षा आयुक्त बांगर यांनी व्यक्त केली.

ना दुरुस्त रस्त्यांबद्दल नागरिकांच्या तीव्र भावना आहेत. त्या भावना योग्यच आहेत. आपण त्याची दखल घेवून सतर्क राहायला पाहिजे. रस्त्यावरील प्रत्येक खड्ड्याबद्दल आपण नागरिकांच्या प्रती उत्तरदायी आहोत, याची सर्व यंत्रणांनी जाणीव ठेवावी. लोकांना त्रास होण्यापूर्वीच रस्ते दुरुस्तीची कारवाई झाली पाहिजे. सर्व यंत्रणा सजग असून तत्काळ कारवाई होत असल्याचा विश्वास नागरिकांना वाटला पाहिजे, असे प्रतिपादन आयुक्त बांगर यांनी केले.

महापालिकेतर्फे रस्ते दुरुस्तीसाठी मास्टिक पध्दतीचा अवलंब करीत आहे. डांबरीकरणात मास्टिक हे अद्ययावत तंत्रज्ञान आहे. डांबराचे तापमान १८० ते २०० डिग्रीपर्यंत असते. त्याचा सेट होण्याचा कालावधी अतिशय कमी आहे. तसेच, ज्या ठिकाणी रस्ते दुरुस्तीसाठी मास्टिक वापरले तेथे चांगला परिणाम दिसला आहे. कोल्डमिक्स पद्धतीने केलेली दुरुस्ती अतिवृष्टीत टिकत नाही, असा आजवरचा अनुभव आहे. त्याशिवाय, मास्टिक हे कोल्डमिक्सपेक्षा आर्थिकदृष्ट्या किफायतशीर आहे. त्यामुळे सर्व यंत्रणांनी त्याचा वापर करावा, अशा सूचना आयुक्त बांगर यांनी दिल्या.

मेट्रो मार्ग हा एकरेषीय आणि रस्त्याच्या ठराविक भागात आहे. त्यामुळे त्या खालील रस्त्याचे नियोजन इतर रस्त्यांच्या तुलनेने सोपे आहे. मेट्रोची यंत्रणा आणि उपलब्ध साधन सामुग्री लक्षात घेता त्यांनी रस्ते दुरुस्तीचा आदर्श घालून द्यावा. म्हणजे इतर यंत्रणांना त्या कामाचा दाखला देऊन तसे काम करून घेता येईल, असे आयुक्त बांगर यांनी स्पष्ट केले.

मेट्रोचे काही ठिकाणी अजूनही बॅरिकेड्स दिसत आहेत. स्टेशन बांधकाम क्षेत्र सोडून इतर ठिकाणी शक्य असेल ते सर्व बॅरिकेड्स हटवावे. तसेच, ज्या भागात आता खोदकाम अर्धवट आहे तिथे काम थांबवून रस्ता वाहतूक योग्य करावा. पाण्याचा निचरा जलद होईल याचीही दक्षता घेतली जावी, असेही आयुक्त बांगर यांनी सांगितले.

रस्ते दुरुस्तीसाठी कोल्ड मिस्क न वापरता मास्टिक वापरावे, पावसाळा असल्याने नवीन कोणतेही खोदकाम करू नये, तसेच सगळे रस्ते वाहतूक योग्य राहतील आणि खड्डा दुरुस्त करताना नीट चौकोन आखून करावा, असेही आयुक्त बांगर यांनी सांगितले. पेव्हर ब्लॉकचा वापर करू नका. त्यामुळे रस्त्याचा उंचसखलपणा वाढतो आणि पाणी साठून आणखी नुकसान होते, असेही आयुक्त बांगर म्हणाले.

नितीन कंपनी-कॅडबरी जंक्शन उड्डाणपूल, माजिवडा उड्डाणपूल, भिवंडी - नाशिक रोड, घोडबंदर रोड, वाघबीळ येथील रस्ते स्थितीवर एमएसआरडीसी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने बारीक लक्ष ठेवावे. विशेष करून नाशिक रोडची दुरुस्ती तात्काळ करावी. तेथे वाहतूक कोंडी झाली की त्याचा थेट परिणाम शहरातील वाहतुकीवर होतो, असे आयुक्त बांगर यांनी निदर्शनास आणले. या बैठकीस नगर अभियंता प्रकाश सोनाग्रा, उपनगर अभियंता रामदास शिंदे, विकास ढोले, महापालिकेचे कार्यकारी अभियंता, यांच्यासह मेट्रो, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएसआरडीसी यांचे अधिकारी उपस्थित होते.

## डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न पुन्हा पेटणार (पान १ वरून)

परंतु स्थानिकांनी केलेल्या आरोपामुळे हा दावा फोल कसा ठरला.याचे पुरावेच यावेळी सादर केले. कचऱ्यामुळे शेतीचे नुकसान होण्याबरोबरच नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून त्याचबरोबर नागरिक दुर्गंधीने हैराण झाले आहेत.

विहीरीतील पाणी खराब झाले आहे, अनेकांना श्वसनाचे विकार जडले आहेत आदी समस्या यावेळी रहिवाशांनी मांडल्या. या प्रकल्पांच्या बदल्यात १४ गावांचा नवी मुंबई महापालिकेत समावेश करण्याचे आश्वासन सरकारने दिले होते. त्याचीही सरकारने अद्याप पूर्तता केली नसल्याचे मनसेचे आमदार प्रमोद पाटील यांनी सांगितले. या शिवाय हा प्रकल्प करीत असतांना येथील रहिवाशांना रस्ता दिला जाईल, इतर सोई सुविधा पुरविल्या जातील असे आश्वासन देण्यात आले होते. परंतु त्याची देखील अद्याप पुर्तता झाली नसल्याचे सांगण्यात आले. तसेच याठिकाणी शास्त्रोक्त पद्धतीने कचरा विल्हेवाट होताना दिसत नाही, अशी टीका आमदार पाटील यांनी केली आहे.

दरम्यान महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी भंडार्ली प्रकल्प बंद करण्यासाठी पुढील दोन महिन्यांची मुदत द्यावी अशी विनंती केली. १५ सप्टेंबरच्या आत येथील कचरा प्रकल्प बंद केला जाईल आणि डायघर प्रकल्प सुरु केला जाईल असे आश्वासन देखील त्यांनी दिले. परंतु रहिवासी त्यांचे म्हणने ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याचे दिसून आले. आधी मुख्यमंत्र्याची भेट घडवून आणा अन्यथा कचरा टाकू देणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला. त्यावर आयुक्तांनी येत्या शुक्रवारच्या आत मुख्यमंत्र्यासमेवत भेट घालून दिली जाईल आणि तुमचे प्रश्न मार्गी लावले जातील असे आश्वासन दिले.

तसेच येथील रस्त्याची, दुर्गंधीची समस्या तत्काळ सोडविली जाईल. रहिवाशांना या प्रकल्पाचा त्रास होणार नाही, याची खबरदारी घेतली जाईल असेही त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय १४ गावांचा समावेश करण्याबाबत संबधींताशी चर्चा केली जाईल असेही त्यांनी सांगितले. अखेर शुक्रवार पर्यंत मुख्यमंत्रासोबत मिटींग लागली नाही तर शनिवार पासून भंडार्लीचा प्रकल्प बंद केला जाईल असा इशारा आमदार पाटील यांनी दिला. तसेच शेतकऱ्यांची नुकसान भरपाई देण्याबरोबर, फवारणी, दुर्गंधी दुर व्हावी आणि रस्त्याचे कामही केले जावे असेही त्यांनी सांगितले.

नियमित प्रसिद्ध होणारे दिवा न्यूज वर्तमानपत्र...
लवकरच 3 ऱ्या वर्षात पदार्पण करत आहे...
दिवा न्यूज
लवकरच नव्या स्वरूपात...

# ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात २३ हजार ५८० वृक्ष लागवड



**ठाणे:** रोपवनाचे संगोपन, देखभाल व संरक्षण वेगवेगळ्या पद्धतीने करून रोपवनातील जिवंत रोपांची टक्केवारी वाढविण्यासाठी बिहार पॅटर्न अंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले आहे. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात २३ हजार ५८० रोपे यंदाच्या पावसाळ्यात लावण्यात आली असून बिहार पॅटर्न अंतर्गत ५ हजार रोपे व लोक सहभागातून १८ हजार ५८० रोपे लावली गेली आहेत.

२०० रोपे लागवड करण्यासाठी १ कुटुंब असणे आवश्यक आहे. वृक्ष संगोपनासाठी संगोपन व संरक्षण २ वर्षे ९ महिन्यांसाठी आहे. तर प्रथम वर्षी जुलै ते मार्च असे ९ महिने, द्वितीय व तृतीय वर्षी प्रत्येकी १२ महिने याप्रमाणे आहेत. कुटुंबांची निवड करताना वयोवृद्ध, विधवा, शारीरिकदृष्ट्या कमजोर, भुमिहीन इत्यादी कुटूंबांना प्राधान्य देण्यात आले आहे. पाच तालुक्यातील प्रत्येकी पाच ग्रामपंचायतीची निवड रोपे लागवड करण्यासाठी करण्यात आली आहे. अंबरनाथ (असनोली, मंगरुळ, चारगांव, पोसारी, मुळगांव), भिवंडी (कुहे, चिंचपाडा, ब्राम्हनगांव, कान्हीवली, गणेशपूर्ती), कल्याण (आने, भिसोळ, रोहन, नडगांव, मानिवली, घोटसई), मुरबाड (कोलोशी, खाणीवरे, दहीगांव शे, सोनावळे, सिंगापूर), शहापूर (भावसे, शिरवंजे, शेरे, आंबर्जे, कळमगाव) या ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली आहे.

ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजिण्यात आलेल्या पाच तालुक्यातील २३ हजार ५८० लावलेल्या रोपांची देखभाल, संगोपन, संरक्षण करण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येत आहे. बिहार पॅटर्न अंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले असून लोक सहभागातून देखील या वर्षी विविध वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. तसेच लोकोपयोगी झाडांची यावर्षी मागणी करुन पुरवठा करण्यात आला आहे अशी माहिती ग्रामपंचायत विभाग प्रमुख प्रमोद काळे यांनी दिली.




# ठाण्यातील ६७ हुन अधिक जुन्या विहिरी होणार पुर्नजीवित

## ५० कोटींचा निधी मंजूर

## पुढील महिन्यात कामाचा श्रीगणेशा
## आमदार प्रताप सरनाईक यांची माहिती

**ठाणे :** ठाणे शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे. महापालिकेकडून होणारा पाणी पुरवठा अपुरा असून अनेकदा तांत्रिक बिघाडामुळे पाणी बंद राहते किंवा एप्रिल-मे महिन्यात पाणी कपातीला नागरिकांना तोंड द्यावे लागते. अशा वेळी टँकरचा भुर्दंड नागरिकांना सहन करावा लागतो. ही बाब लक्षात घेत केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. त्यामुळे ठाण्यात ६७ हुन अधिक जुन्या विहिरी पुर्नजीवित होणार आहेत. त्यासाठी राज्य शासनाने ५० कोटींचा निधी मंजूर केला आहे. त्यापैकी पहिल्या टप्यात ५ कोटी रुपये इतका निधी महापालिकेकडे वर्ग झाला असून हे काम पुढील महिन्या सुरु होईल, अशी माहिती आमदार प्रताप सरनाईक यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

शहरात पूर्वीच्या काळापासून असलेल्या विहिरी पुर्नजीवित कराव्यात, या विहिरींमधील पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत जपले जावेत, भविष्याच्या दृष्टीने हे पाणी उपयोगी पडण्यासाठी सर्व विहिरींची शास्त्रोक्त पद्धतीने साफ सफाई करून नैसर्गिक व पिण्यायोग्य पाणी निर्माण करणे गरजेचे असल्यामुळे या विहिरी स्वच्छ करून त्याचा पुन्हा वापर झाला पाहिजे, अशी आमदार प्रताप सरनाईक यांची संकल्पना आहे. त्यासाठी सर्वच विहिरींची टप्या टप्याने साफ सफाई करून विहिरींमधील नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत जिवंत करण्यासाठी एकूण ५० कोटी रुपये निधीची आवश्यकता असल्याने त्याकरिता ते राज्य शासनाकडे पाठपुरावा करीत होते. त्याला यश आले आहे.

आजच्या वाढत्या नागरीकरणात शुद्ध पाणी ही काळाची गरज आहे. शहरात अनेक ठिकाणी पूर्वीच्या विहिरी बुजवल्या गेल्या आहेत. काही विहिरी १०० वर्ष जुन्या आहेत. काही ठिकाणी विकासकांनी विहिरी आपल्या कामासाठी बुजवल्या आहेत. काही ठिकाणी कचराकुंडी म्हणून विहिरीचा वापर होतोय. काही भागात मूर्ती विसर्जनासाठी विहिरींचा वापर केला जातो. तर काही विहिरींमध्ये चक्क सांडपाणी सोडून विहिरी प्रदूषित केल्या गेल्या आहेत. अशा बहुतांश सगळ्या विहिरी घाण झाल्या असून पाण्याला दुर्गंधी येते. हे पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत बंद होत चालले आहेत. पाण्याचे महत्व ओळखून नैसर्गिक स्त्रोत टिकवून ठेवणे आणि विविध संवर्धन प्रकल्प हाती घेणे आवश्यक असून त्यामुळे आता सर्व विहिरींचे पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत जिवंत केले जातील व या पाण्याचा उपयोग नागरिकांना दैनंदिन जीवनात कसा होईल हे पाहिले जाईल, असे आमदार सरनाईक यांनी म्हटले आहे.

ठाणे शहरातील ओवळा-माजिवडा मतदारसंघातील लोकमान्यनगर, उपवन, येऊर, माजिवडा, कासारवडवली, मोघरपाडा, घोडबंदर रोड येथील काही पट्टा हा आदिवासी भाग असून येथे अनेक वर्षांपूर्वी महापालिकेची पाणी योजना नव्हती. तेव्हा लोक पिण्यासाठी ह्या विहिरींचेच पाणी वापरायचे. त्यामुळे आता पुन्हा विहिरींची शास्त्रोक्त पद्धतीने स्वच्छता करून हे पाणी पिण्या योग्य बनविण्यास प्राधान्य दिले जाईल. लोक पिण्यासाठी नाही तर रोजच्या इतर कामांसाठी हे पाणी वापरू शकतात, असेही त्यांनी सांगितले.

विहिरींच्या संवर्धन प्रकल्पात सर्व विहिरींची खोदाई करून साफसफाई केली जाईल. विहिरी या पाण्याच्या स्थानिक नैसर्गिक स्त्रोत असल्याने त्यातील पाण्याचे झरे जिवंत केले जातील. जर कोणत्या विहिरीत सांडपाणी सोडले जात असेल तर ते बंद केले जाईल. म्हणजे विहिरींमधील जलप्रदूषण पूर्णपणे थांबवून तेथे विहिरीचे कठडे नव्याने बांधून, प्लास्टरिंग करणे व सुरक्षिततेच्या दृष्टीने ग्रील लावण्यात येणार आहे. तसेच या कामाचे वैशिठ्य म्हणजे विहिरींच्या वर जलशुद्धीकरण सयंत्र लावण्यात येणार आहे. हे यंत्र पूर्णतः सौर उर्जेवर चालणारे असेल. इनलेट पॅरामीटर्स वर आधारीत वॉटर ट्रीटमेंट प्लांटची रचना करण्यात येणार आहे. या यंत्रणेत वाळू गाळण्याची प्रक्रिया कार्बन फिल्टरेशन, अल्ट्रा फिल्टरेशन, यु.व्ही. प्रणालीचा समावेश केला आहे जेणेकरून विभागातील नागरिकांना दैनंदिन वापराकरिता योग्य असे पाणी उपलब्ध होणार आहे, असे सरनाईक यांनी सांगितले.

भविष्यात पाण्याची गरज वाढतच राहणार आहे आणि पाण्याचे सर्व नैसर्गिक स्त्रोत टिकवून ठेवणे, पाण्याची बचत करणे आणि संवर्धन करणे हे भविष्याची गरज ओळखून हा संवर्धन प्रकल्प हाती घेतला आहे. या विहिरींना संरक्षक जाळीही लावले जाईल. जेणेकरून त्यात कोणी कचरा टाकणार नाही किंवा पाणी प्रदूषित करणार नाही, असेही आमदार सरनाईक म्हणाले.

# क्रीडा संकुलातील सुविधांचा केंद्रबिंदू खेळाडूच हवा!

## ठामपा आयुक्त अभिजीत बांगर



## कला दालनाची पाहणी

**माजिवडा येथील ठाणे कला दालनाची पाहणी ही आयुक्त बांगर यांनी केली. २०१९ पासून बंद असलेल्या या दालनाची दुरावस्था झाली आहे. गळतीमुळे सर्वाधिक नुकसान झालेले आहे. त्यामुळे आधी या गळतीचा बंदोबस्त करावा. त्यानंतर या कला दालनाचे रुप कसे बदलता येईल यासाठी तज्ज्ञांचा सल्ला घेवू, असे आयुक्त बांगर यांनी स्पष्ट केले.**

**या पाहणी दौऱ्यात उपनगर अभियंता रामदास शिंदे, क्रीडा अधिकारी मीनल पालांडे, कार्यकारी अभियंता संजय कदम, प्रशांत पाठक आदी उपस्थित होते.**

## वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केवळ कार्यालयात बसून त्यावर सही करू नये

## आयुक्तांनी सुनावले

**ठाणे : ठाणे महानगरपालिकेच्या ढोकाळी येथील शरदचंद्र पवार मिनी क्रीडा संकुलाची पाहणी महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी बुधवारी केली. खेळाडूंच्या अडचणी प्राधान्याने दूर करून या क्रीडा संकुलाचा वेगवेगळ्या क्रीडा प्रकारांसाठी जास्तीत जास्त वापर करावा, असे निर्देश बांगर यांनी दिले. दरम्यान अंदाजपत्रक बनविताना प्रत्यक्ष साईटवर पाहणी करून, व्यवस्थित विचार केल्याशिवाय अंदाजपत्रक बनवू नये. तसेच, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केवळ कार्यालयात बसून त्यावर सही करू नये, अशा शब्दांत आयुक्त बांगर यांनी अधिकाऱ्यांना सुनावले. अंदाजपत्रकातील बाबी आणि प्रत्यक्ष स्थिती याच्यात तफावत आढळली तर त्याची जबाबदारी निश्चित केली जाईल, असेही आयुक्त बांगर यांनी यावेळी स्पष्ट केले.**

या क्रीडा संकुलातील दुरुस्ती आणि परिसराचे काँक्रीटीकरण करण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने सादर केला आहे.

त्यावर निर्णय घेण्यापूर्वी आयुक्त बांगर यांनी क्रीडा संकुलाच्या स्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्याचा निर्णय घेतला. सन २०१४ मध्ये लोकार्पण झालेल्या या क्रीडा संकुलात



बॅडमिंटन, क्रिकेट, व्हॉलीबॉल, टेनिस, टेबल टेनिस, कॅरम आणि बुद्धिबळ हे खेळ खेळण्याचा सुविधा उपलब्ध आहेत. या भेटीदरम्यान बॅडमिंटन आणि क्रिकेटचा सराव आयुक्त बांगर यांनी पाहिला. तसेच, बॅडमिंटनच्या प्रशिक्षकांशी संवाद साधला.

बॅडमिंटन हॉलमध्ये अजूनही काही प्रमाणात गळती होत आहे. बॅडमिंटन कोर्टचे फ्लोअरिंग असमान झाले असून त्याची दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. हवा खेळती राहण्यासाठी त्या हॉलच्या क्षमतेचा विचार करून एक्झॉस्ट फॅन बसविणे, हॉलची प्रकाशमानता वाढविणे. तसेच, प्रेक्षक गॅलरीत बसवण्यात आलेल्या काचांची सुरक्षा वाढविणे, या गोष्टी योग्य पद्धतीने मार्गी लावण्याच्या सूचना आयुक्त बांगर यांनी दिल्या.

क्रीडा संकुलातील अंतर्भागात भिंतीवर लावण्यात आलेल्या टाइल्स मोठ्या प्रमाणावर निखळल्या आहेत. मोठ्या काचा पडू लागल्या आहेत. तसेच, गळतीमुळे काही ठिकाणी फॉल सिलिंगचेही नुकसान झाले आहे. पारदर्शक छतासाठी बसविण्यात आलेले पत्रेही जीर्ण झाले आहेत म्हणून गळती होते, असे म्हणणे क्रीडा संकुल व्यवस्थापनाने मांडले. त्यावर, त्या पत्र्यांची क्षमता तपासून पाहून आवश्यकता भासल्यास पूर्ण पत्रे बदलावेत आणि आवश्यक त्या दुरुस्ती करून घ्याव्यात, असे आयुक्त श्री. बांगर म्हणाले. ही कामे दोषता निवारण कालावधी (डिफेक्ट लायबिलिटी पिरियड) मध्ये असल्यास ती संबंधित कंत्राटदारांकडून करून घ्यावीत, असेही आयुक्त बांगर यांनी स्पष्ट केले.

क्रीडा संकुलाच्या आवारात यू टी पद्धतीने काँक्रीटीकरण प्रस्तावित आहे. हे काम करण्यापूर्वी क्रीडा संकुलाच्या आतील कामे प्राधान्याने करावीत. ज्याचा खेळाडूंना फायदा होणार आहे अशी कामे पूर्ण झाल्यावर आवश्यकतेनुसार बाहेरील कामे हाती घेतली जावीत, असे निर्देश आयुक्त बांगर यांनी दिले. तसेच क्रीडा संकुलाच्या बाह्य भिंतीवरील क्रीडापटूंची चित्रे चांगल्या दर्जाची असावीत, अशी अपेक्षाही आयुक्तांनी व्यक्त केली.

क्रीडा संकुलाच्या आतील प्रस्तावित कामांच्या अंदाजपत्रकानुसार प्रत्यक्ष पाहणी केल्यावर आयुक्त बांगर यांनी अंदाजपत्रकातील बाबी अधिकाऱ्यांसमक्ष पडताळून पाहिल्या. त्यात आढळलेल्या त्रुटींचा जाबही आयुक्तांनी विचारला.

# ठाण्यात एलफिस्टनची दुर्घटना घडल्यास महापालिका जबाबदार असेल

## खासदार राजन विचारे

**ठाणे:** ऐतिहासिक ठाणे रेल्वे स्थानकातून दररोज ७ ते ८ लाख प्रवासी ये जा करीत असताना ज्या पादचारी पुलाचा वापर प्रवासी करीत आहेत ते पूल अपुरे पडत असल्याने प्रवाश्यांना स्थानकाबाहेर पडत असताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ठाणेकर नागरिकांच्या प्रवाश्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून काही वर्षापूर्वी एलफिस्टन रोड या रेल्वे स्थानकाच्या पादचारी पुलावर घडलेल्या दुर्घटनेत अनेकांना आपले प्राण गमवावे लागले होते. या दुर्घटनेची पुनरावृत्ती ठाण्यामध्ये होऊ नये, या काळजीपोटी खासदार राजन विचारे यांनी ठाणे महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांना पुन्हा एकदा स्मरणपत्र देवून उर्वरित निधी वर्ग करण्याची आठवण पत्राद्वारे केली .

खासदार विचारे यांनी या धोकादायक झालेल्या पादचारी पुलाच्या कामासाठी सन २०१९ मध्ये २४ कोटी मंजूर करून घेतले होते. त्यापैकी महापालिकेने रेल्वेकडे ८ कोटी रक्कम जमा केली आहे. व उर्वरित रक्कम २०२०-२०२१ च्या आर्थिक वर्षात दिली जाईल असे ११ डिसेंबर २०१९ च्या गोषवाऱ्याद्वारे कबुल केले होते. परंतु उर्वरित निधी अद्याप न दिल्याने रेल्वेने काम धीम्यागतीने सुरु ठेवलेले आहे. तो उर्वरित निधी तात्काळ रेल्वेकडे वर्ग करावा अशी मागणी आज पत्राद्वारे केली आहे. तसेच महापालिकेने रंगरंगोटी व विद्युत रोषणाई वर पैसे खर्च न करता ठाणेकर नागरिकांच्या मुळ गरजा लक्षात घेऊन पादचारी पुलासाठी उर्वरित निधी रेल्वेकडे वर्ग करा त्याचबरोबर या पत्रात असेही म्हंटले आहे कि, भविष्यात एलफिस्टन रोड येथील पादचारी पुलावर झालेल्या दुर्घटनेची पुनरावृत्ती झाल्यास ठाणे महापालिका जबाबदार असेल असा ठोस इशारा या पत्राद्वारे दिला आहे.

# एक नाला होणार भ्रष्टाचारमुक्त!

## ठाण्यात लोकसहभागातून साकारू लागली नाले दत्तक योजना




**ठाणे:** दरवर्षी नालेसफाई होत असलेल्या भ्रष्टाचाराला वाचा फोडत असताना आमदार संजय केळकर यांनी आदर्श नाले बांधणी आणि नाले दत्तक योजनेचा अभिनव प्रयोग ठाणे शहरात मांडला आहे. लोकसहभागातून होत असलेल्या या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून त्याची पाहणी शनिवारी त्यांनी केली.

ठाणे शहराला नाल्यांची समस्या कायम भेडसावत असून नालेसफाईतून दरवर्षी मोठा भ्रष्टाचार होत असतो. आमदार संजय केळकर पावसाळ्यापूर्वी नाल्यांची पाहणी करून प्रशासनाला सूचना करत असतात. ही समस्या कायमस्वरूपी सुटावी आणि भ्रष्टाचार थांबावा यासाठी त्यांनी लोकसहभागातून आदर्श नाले बांधणी आणि नाले दत्तक योजना ही संकल्पना पुढे आणली. जागर फाऊंडेशन या संस्थेने आयुक्तांकडे याबाबतचा प्रस्ताव दाखल केला तर केळकर यांनी आयुक्तांना याबाबतची उपयुक्तता पटवून दिल्यानंतर आयुक्त अभिजित बांगर यांनी योजनेस हिरवा कंदील दिला.

या प्रकल्पाच्या कामाची पाहणी करताना आमदार संजय केळकर यांनी समाधान व्यक्त केले. हा प्रयोग ठाण्यात प्रथमच राबवला जात असून परिसर सुंदर आणि स्वच्छ राहणार आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यास शहरात अनेक ठिकाणी त्याची अमलबजावणी करून नाले भ्रष्टाचारमुक्त करता येतील, पर्यायाने ठाणेकरांनी महापालिकेला कररुपाने दिलेल्या पैशांची उधळपट्टी होणार नाही, असे मत केळकर यांनी मांडले.

या योजनेसाठी डॉ.मूस मार्गालगतचा नाला निवडण्यात आला. अंदाजे ३००फूट लांब आणि ३० फूट रुंद नाल्यावर आधुनिक पद्धतीने आवरण चढवण्यात येऊन पलिकडून वाहत येणारी घाण ठराविक अंतरावर रोखण्यात येणार आहे. त्यामुळे पुढे पाण्याचा प्रवाह मोकळा होणार आहे. साचलेली घाण काढण्यासाठी पोकलेन उतरेल अशी पुरेशी जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नाल्याच्या दोन्ही बाजूस आवरण करण्यात येणार असून व्हर्टीकल गार्डन करता येणार आहे. यामुळे परिसर सुंदर दिसेलच, शिवाय नाला दुर्गंधीमुक्त होणार आहे.

पाहणी दरम्यान आमदार केळकर यांच्याबरोबर माजी नगरसेवक संजय वाघुले, ठाणे जिल्हा हाउसिंग फेडरेशनचे अध्यक्ष सीताराम राणे, परिवहन समितीचे सदस्य विकास पाटील, बोरकर रियल्टीचे महेश बोरकर, नंदिनी बोरकर सारंगधर, जागर फाऊंडेशनचे अध्यक्ष सुरेश सोंडकर आणि स्थानिक रहिवासी उपस्थित होते.

# बारवी पुनर्वसित गावांना दर्जेदार सुविधा पुरविण्यासाठी अधिकाऱ्यांची समिती





## केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांचे निर्देश

**ठाणे :** बारवी धरणामध्ये घर व जमीन दिलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या ८ पुनर्वसित गावांमध्ये सध्या पुरविलेल्या सुविधांचा आढावा घेऊन नवीन दर्जे दार सुविधा पुरविण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांच्या समितीकडून पाहणी करावी. या समितीच्या अहवालानंतर या गावांमध्ये स्थायी स्वरुपाची कामे करावीत, असे निर्देश केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी शुक्रवारी येथे दिले. तसेच आठ गावांना महसूली दर्जा देण्यासाठी प्रक्रिया सुरू करण्याच्या सूचनाही दिल्या.

बारवी प्रकल्पग्रस्तांच्या ८ पुनर्वसित गावांमधील सुविधा, प्रकल्पग्रस्तांना नोकरी व घरे, जमिनीबद्दल प्रलंबित नुकसानभरपाई आदी प्रश्नांबाबत केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेतली. या बैठकीला जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, कल्याण महापालिका आयुक्त भाऊसाहेब दांगडे यांच्यासह महसूल, एमआयडीसी, वन विभागाचे अधिकारी, प्रकल्पग्रस्तांचे प्रतिनिधी रामभाऊ बांगर, रामभाऊ दळवी, दीपक खाटेघरे यांच्यासह काही प्रकल्पग्रस्तांचीही उपस्थिती होती.

बारवी प्रकल्पग्रस्तांच्या ८ गावांमध्ये पुरेशा सुविधा नाहीत. त्यामुळे ग्रामस्थांचे हाल होत आहेत. या गावांमध्ये होणारा पाणीपुरवठा, शाळा, रस्ते, स्मशानभूमी, गटारे आदी सुविधांबाबत संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पाहणी करावी. तसेच अपेक्षित कामांचा खर्चासह सविस्तर अहवाल तयार करून एमआयडीसीकडे पाठवावा. त्यानंतर या गावांतील सुविधांसाठी 'एमआयडीसी'ने जिल्हा परिषदेकडे निधी वर्ग करावा, असे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी दिले.घर व जमिनीबद्दल पैसे असा प्रस्ताव स्विकारलेल्या १२५ हून अधिक प्रकल्पग्रस्तांना पैसे देण्याची कार्यवाही तत्काळ सुरू करण्याचे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी दिले. तर प्रस्ताव मंजूर झालेल्या ४६ प्रकल्पग्रस्तांच्या खात्यात सोमवारी पैसे जमा करण्याच्या सूचनाही दिल्या. तसेच उर्वरित प्रकल्पग्रस्तांना पैसै देण्यासाठी स्टेमसह सर्व महापालिका व नगरपालिकांनी निधी देण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. वन खात्यामार्फतही प्रलंबित रक्कम तत्काळ देण्याची कार्यवाही करण्यास सांगण्यात आले. बारवी प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांकडे अधिकाऱ्यांनी संवेदनशीलतेने पाहावे, असे आवाहनही पाटील यांनी केले.

# ठाण्यात मोठा शस्त्रसाठा जप्त

## वागळे इस्टेट शाखा घटक ५ ची कामगिरी

**ठाणे:** शहरातील वागळे इस्टेट पोलीस ठाण्यामधील दाखल असलेल्या एका गुन्हयात पाहीजे असलेला सुरजीतसिंग उर्फ माजा आवसिंग (२७) हा अग्निशस्त्र विक्रीकरीता आला असताना, त्याला वागळे इस्टेट गुन्हे शाखा घटक ५ ने मोठया शिताफीने मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र या दोन राज्यांच्या सीमेवर गजाआड केले. तसेच त्याच्याकडून २० गावठी बनावटीचे स्टिल पिस्टल, १ गावठी बनावटीची मशिनगन २ मॅग्झीनसह २८० जिवंत काडतुसे जप्त केले असून त्याची किंमत अंदाजे साडे दहा लाख आहे. त्याला येत्या १८ जुलै पर्यंत पोलीस कोठडी मिळाली असून तो हा मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा कोणाला विकण्यासाठी आला होता तसेच आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून विक्रीसाठी आला होता का? त्यादृष्टीने तपास सुरू असल्याची माहिती पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी दिली.

मोठ्या प्रमाणात अग्निशस्त्र साठा घेवुन ठाण्यातील वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात पाहिजे असलेला मध्यप्रदेश मधील माजा नामक तरुण धुळे येथील पलासनेस या गावात येणार असल्याची माहिती वागळे इस्टेट शाखा घटक ५ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विकास घोडके यांना मिळाली होती. त्यानुसार सापळा रचून त्याला ११ जुलै रोजी अटक करण्यात आली. यावेळी त्याच्याकडून २० गावठी बनावटीचे स्टिल पिस्टल, १ गावठी बनावटीची मशिनगन २ मॅग्झीनसह व २८० जिवंत काडतुसे जप्त केले आहेत. त्या न्यायालयात हजर केले असता,त्याला १८ जुलै पर्यंत पोलीस कोठडी मिळाली आहे. यापूर्वी तिघांनी अटक करत त्यांच्याकडून एक बंदूक हस्तगत केली होती. त्या गुन्ह्यामध्ये पाहिजे असलेला माजा याचा समावेश होता. ही कामगिरी

वागळे युनिट-५, ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विकास घोडके, सहायक पोलीस निरीक्षक भुषण शिंदे, अविनाश महाजन, पोलीस उपनिरीक्षक सुनिल अहिरे, पोलीस हवालदार संदिप शिंदे, रोहीदास रावते, सुनिल निकम, शशिकांत नागपुरे, विजय पाटील, माधव वाघचौरे, सुनिल रावते, विजय काटकर, अजय साबळे, सुनिता गिते, ल मिनाक्षी मोहिते, पोलीस नाईक उत्तम शेळके, तेजस ठाणेकर, पोलीस शिपाई यश यादव, या पथकाने केली.